# क्रांतिघोष

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**क्रांतिघोष : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# क्रांतिघोष

## अनुक्रमणिका


- एक धक्का और दो ! / ७
- पक्षभेद विसरा, स्वातंत्र्यदिन साजरा करा / १८
- राष्ट्रभाषा नि भाषाशुद्धी / २३
- अस्पृश्यतेवर शेवटची चढाई / ३२
- हिंदु कोण? / ४१
- स्त्री-जीवनाचे ध्येय ! / ४७
- सैनिक व्हा ! / ५७
- माणूस, माकड आणि टोळ ! / ६२
- पूरक धान्ये / ६९
- अभिनव भारत सांगता / ७६
- युद्धसज्ज व्हा ! / १५४
- सागरा प्राण तळमळला, ही कविता कशी लिहिली? / १५८
- धर्मान्तर म्हणजे राष्ट्रान्तर / १६४
- महाराष्ट्र हा हिन्दुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे ! / १७२


✦✦

# एक धक्का और दो!

१५ ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थान स्वतंत्र झाला. त्या रात्री राजधानी दिल्लीतील इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानचा राज्यध्वज फडकला. इंग्रज गेले पण जाताना त्यांनी देशाची फाळणी केली! पुढे सहा महिन्यांच्या आतच ३० जानेवारी १९४८ ला गांधीजींचा वध झाला. त्या वधाच्या आरोपाखाली क्रांतिकारकांचे नेते वीर सावरकर यांनाही अटक करण्यात आली! या गांधीवधाच्या प्रकरणात सर्व देशांतील सहस्रावधी हिंदुसभा सदस्यांना अटक झालेली होती. त्यामुळे हिंदुमहासभेचे कार्यही थंडावले होते. हा गांधीवध अभियोग एक वर्ष चालला आणि १० फेब्रुवारी १९४९ ला त्याचा निर्णय लागला. त्यात वीर सावरकरांना निर्दोषी म्हणून मुक्त करण्यात आले. त्यानंतर दहा महिन्यांनी, कलकत्ता येथे हिंदुमहासभेचे वार्षिक अधिवेशन झाले. ह्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रथम स्वातंत्र्यवीर सावरकर यांचीच निवड झाली; पण त्यांनी ते दायित्व घेण्याचे अमान्य केले. त्यांनीच डॉ. खरे यांची निवड करावी असे आग्रहाने सांगितले. त्याप्रमाणे डॉ. ना. भा. खरे यांची अध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्या नि अन्य कार्यकर्त्यांच्या अत्यंत आग्रहाच्या निमंत्रणामुळे ह्या अधिवेशनाचे उद्घाटन करण्याचे स्वा. सावरकरांनी मान्य केले. त्यासाठी ते कलकत्ता येते जात असता ठिकठिकाणी त्यांचे भव्य स्वागत केले. कलकत्ता येथे तर मिरवणूक काढण्यात आली. त्यांचे उद्घाटनाचे भाषण ऐकण्यासाठी प्रवेशपत्रिका घेऊन एक लाख लोक उपस्थित होते.

या अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी दि. २१-१२-४९ या दिवशी सायंकाळी कलकत्ता मेलने स्वा. सावरकर मुंबईहून निघाले. बोरीबंदर स्थानकावर त्यांना थाटाचा निरोप देण्यात आला. मुंबईचे नि महाराष्ट्राचे जवळ जवळ १५०

प्रतिनिधी त्यांच्यासमवेत त्याच गाडीने गेले. त्यांना निरोप देण्यासाठी स्थानकावर हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांची नि अनेक चाहत्यांची आधीच दाटी झाली होती. त्या वेळी वीर सावरकरांना अनेक संस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आले. 'अखंड भारत अमर रहे', 'वंदे मातरम्', 'वीर सावरकर की जय', 'हिंदुओंका हिंदुस्थान', 'लढके लेंगे पाकिस्तान', 'पं. नथुराम गोडसे की जय' आदी घोषणांनी सबंध स्थानक दुमदुमून गेले होते. जमावाची उत्सुकता पाहून सावरकरांनी डब्याच्या दाराशी येऊन सर्वांना दर्शन दिले; पण जमाव हटेना. त्यांनी याप्रसंगी काही तरी बोलावे अशी अपेक्षा दिसली तेव्हा ते म्हणाले-

''आज दोन वर्षांनंतर तुम्ही मला भेटला नि पूर्वीच्या चिरपरिचित घोषणांनीच माझे स्वागत करता हे पाहून मला आनंद होतो. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे मी पूर्वीसारखा मोठ्याने नि दीर्घकाल बोलू शकत नाही. तथापि दोनच शब्द सांगतो. त्यावर आपण समाधान मानावे. आज येथे घोषणा करणारांचा पूर्वीचा उत्साह नि निर्धार कायम आहे. ते आज दहाच असले तरी उद्या ते दहा कोटी होतील, आपले ध्येय साध्य करून घेतील यात मला संदेह वाटत नाही. मी जाईन, मला फाशीही देतील; पण हिंदुराष्ट्र, हिंदुसमाज, हिंदुधर्म यांना फाशी देणे कालत्रयीही शक्य नाही, याचा मला विश्वास वाटतो, इतकेच मी तुम्हाला सांगतो.''

भाषण केल्यानंतर सावरकर आत जाऊन बसले; पण पुन्हा नवीन लोटणाऱ्या जमावाला दर्शन देण्यासाठी गाडी सुटण्यापूर्वी काही क्षण पुन्हा ते दरवाजात उभे राहिले, ते गाडी सुटेपर्यंत तसेच होते. आपल्याला गाडीत निरोपाप्रीत्यर्थ मिळालेल्या हारांपैकी एक हार त्यांनी भगव्या ध्वजाला घातला नि इतर जमावात उधळून दिले.

पुढे कल्याण स्थानकावर सहस्रावधी प्रेक्षकांचा लोंढा वीर सावरकर यांच्या दर्शनासाठी लोटला होता. त्याला उद्देशून ते म्हणाले, ''खंडित भारताला अखंड करण्यासाठी सध्याच्या स्वातंत्र्याची जोपासना करून आपण अजिंक्य बनले पाहिजे.'' आपल्यापुढील अनेक समस्या कशा सोडवाव्या याचे दिग्दर्शन कलकत्त्याच्या अधिवेशनात उद्‌घाटनाच्या भाषणात आपण करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

पुढे सकाळी मूर्तिजापूर स्थानकावर स्वागतास स्थानिक मंडळींसंगेच कॅप्टन शिवाजीराव दामले हेही होते. अर्थातच आजच्या परिस्थितीला साजेसा संदेश देताना



वीर सावरकर यांनी श्री. दामले यांचा निर्देश करून सैनिकीकरणाची आवश्यकता प्रतिपादून घरटी एक तरुण तरी आपल्यातून सैन्यास देण्याचा जनतेला आदेश दिला. परत एकसंधी अखंड भारत करावयाचा असेल तर आधी तीनचतुर्थांश असलेला भारत बलशाली, सामर्थ्यसंपन्न बनविला पाहिजे. त्यासाठी हिंदुराष्ट्राचे सैनिकीकरण करणे क्रमप्राप्तच असल्याचे त्यांनी सांगितले.

अकोला स्थानकावर अनेक संस्थांनी पुष्पहार अर्पण करून त्यांचा सत्कार केला. स्वागतार्थ जमलेल्या मंडळींनी स्थानक भरून गेले होते. त्यांना उद्देशून स्वा. सावरकर म्हणाले, ''आता हिंदुस्थान स्वतंत्र झाला आहे. खड्यांच्या लढाईचा धडा ध्यानात ठेवून हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आपण पाकिस्तानचे आक्रमणापासून सावध राहून आपल्यामध्ये संरक्षणक्षमता निर्माण केली पाहिजे. १५० वर्षांनंतर आपण पुन्हा स्वतंत्र झाला आहोत. सध्याची हताश वृत्ती असमर्थनीय आहे. क्षुल्लक भांडणे नि क्षुद्र पराभव यांचे चिरकालीन यशात रूपांतर करा.''

बडनेरा येथील प्रचंड स्वागताला उत्तर देताना स्वातंत्र्यवीर म्हणाले, ''मिळालेले स्वातंत्र्य टिकवून आपण भारतवर्ष अभेद्य करू अशी निश्चिती आहे. स्वातंत्र्य-संपादन हा मोठाच विजय आहे. आता निराशापटल झुगारून देऊन आपसातील मतभेद दूर करून आपला विजय चिरंजीव होईल असे प्रयत्न केले पाहिजेत.''

कलकत्ता मेल नागपूर स्थानकात शिरताच स्वा. सावरकरांचा प्रचंड जयजयकार झाला. स्त्रियांनी पंचारती ओवाळून त्यांचे स्वागत केले. त्यांच्यासाठी स्वतंत्र उभारलेल्या व्यासपीठावरून दर्शनोत्सुक जनसमुदायाला उद्देशून ते म्हणाले-

''आपले अखंड भारताचे साध्य पूर्वीपेक्षा अधिक समीप आलेले आहे. दोन वर्षांच्या कष्टप्रद आणि वनवासकालातून हिंदुमहासभा अधिक सामर्थ्यसंपन्न होऊन व तावूनसुलाखून बाहेर आली आहे. मध्यंतरीच्या काळात ज्या घटना घडल्या त्यामुळे तिच्या तत्त्वप्रणालीची पूर्ण सत्यता पटली आहे. आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य देशाची फाळणी होऊन मिळालेले आहे; पण माझी निश्चिती आहे की, विभागलेले सर्व प्रदेश पुन्हा अखंड भारताच्या ध्वजाखाली एकत्र झाल्याविना राहणार नाहीत. ज्या देशांत हिंदूंची प्रचंड संख्या आहे ते राज्य 'निधर्मी' असे म्हणणे चुकीचे आहे. हिंदुराष्ट्र

स्थापणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे. भारत प्रजासत्ताक होणार याचा अर्थ येथे हिंदुराज्य स्थापन होणार. कारण लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य आणि येथे हिंदूंचे बहुमत आहे. हिंदुमहासभेची शक्ती दिन प्रतिदिन वाढत जाईल आणि ती आपले ईप्सित साध्य करील.''

त्यापुढच्याही अनेक स्थानकांवर स्वातंत्र्यवीरांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांनी त्या त्या समयी छोटी छोटी भाषणेही केली. दि. २३ ला कलकत्ता स्थानक तर त्यांच्या जयघोषांनी, क्रांतिघोषांनी दुमदुमून गेले! तेथून पुढे त्यांची आणि हिंदुमहासभेचे अध्यक्ष धर्मवीर ल. ब. भोपटकर आणि नियोजित अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. त्या दिवशी सायंकाळी हिंदुमहासभा अधिवेशनाच्या उद्‌घाटनाच्या भाषणासाठी सावरकर उभे राहिले.

या भाषणात हिंदुहृदयसम्राट वीर सावरकर म्हणाले, ''भारताच्या मार्गात कितीही अडचणी उभ्या असल्या तरी आज भारत स्वतंत्र झाला आहे. हजारो वर्षांनी परतंत्र हिंदुस्थान स्वतंत्र झाला व आपणच आपले भाग्यविधाते झालो आहोत, ही गोष्ट निश्चलपणे लक्षात ठेवली पाहिजे. भारताचे हे मोठे सद्‌भाग्य आहे. कित्येक पिढ्यांच्या नि सहस्र वर्षांच्या पारतंत्र्याची रात्र संपली. इंग्रज गेले. त्यांचा एकही सोजीर हिंदुस्थानात राहिला नाही. मोगलांच्या पारतंत्र्यातून हिंदुस्थानचा काही भाग रजपुतांनी सोडविला. शिवाजी महाराजांनी हिंदूंना स्वराज्य दिले, तथापि आज अखिल भारत स्वतंत्र झाल्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. ते स्वातंत्र्य काँग्रेसने मिळविले नाही, एकट्या कोणीही मिळवले नाही. हे स्वातंत्र्य १८५७ ते १९४७ च्या काळच्या सर्व हिंदुराष्ट्राच्या भगीरथ प्रयत्नांचे फळ आहे.

''कोणी काही म्हणो, भारतात ८५ टक्के प्रजा हिंदु असल्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या हिंदुराष्ट्र अवतीर्ण झाले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. आज हिंदूच अधिकारूढ आहेत. गव्हर्नर जनरल, प्रधानमंत्री, उपप्रधान सर्व हिंदु आहेत. आपल्या चतुरंग सेनेत सर्व हिंदूच आहेत, म्हणून आज भारताच्या राजधानीवर फडकणारा ध्वज हिंदुध्वजच आहे. या देशाच्या राज्यकारभाराला निधर्मी, लोकसत्ताक फार काय फॅसिस्ट असेही कोणी संबोधिले तरी हा देश हिंदूंचाच आहे व तो हिंदुराष्ट्रच राहील. आपल्या ध्वजावर असणारे अशोकचक्र हे धर्मचक्र असून ते



शक्तीचे प्रतीक आहे. शतकानुशतके भारत शांततेचा पुरस्कर्ता आहे, तथापि या देशावर जर कोणी आक्रमण केले तर मात्र या ध्वजातील चक्राला सुदर्शन चक्राचे भव्य व शत्रुसंहारक स्वरूप आल्यावाचून राहणार नाही.

''ब्रिटिशांनी हिंदुस्थानला स्वातंत्र्याचे दान केले हे म्हणणे बरोबर नाही. हिंदुस्थानचे राज्य करणे व्यवहारात: अशक्य झाल्यामुळे त्यांनी हिंदुस्थानातून पाय काढला. गेली कित्येक वर्षे हिंदुस्थानने ब्रिटिशांशी प्राणपणाने झुंज घेतली म्हणूनच ते येथून गेले ही गोष्ट सदैव दृष्टीपुढे ठेवली पाहिजे.''

अशा तऱ्हेचे स्फूर्तिदायक भाषण चालू असतानाच दूरध्वनिक्षेपक बिघडला. कोणास भाषण ऐकू येईनासे झाले. प्रयत्न करूनही ध्वनिवर्धक दुरुस्त न झाल्याने स्वागताध्यक्षांनी त्या दिवशीचे काम बंद ठेवून दि. २५ ला पुन: अधिवेशनास आरंभ होईल असे प्रकट केले.

त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजता 'वंदे मातरम्'च्या सुस्वर गायनाने प्रारंभ झाला. आपल्या प्रिय नेत्याच्या वाक्‌गंगेचे प्राशन करण्यासाठी आलेला पण काल निराशेने परत गेलेला जनसागर या दुसऱ्या दिवशी दुप्पट संख्येने नि चौपट उत्साहाने अधिवेशनास प्रारंभ होण्याआधीच आलेला असल्याने सारा सभामंडप नुसता फुलून गेलेला होता. ठीक तीन वाजता वीर सावरकर यांचे आगमन होताच उत्साहाचे भरते आलेल्या जनसागराने उत्थापन देऊन वीर सावरकर यांचे स्वागत करताना 'हमारा नेता वीर सावरकर', 'अखंड भारत अमर रहे', 'एक धक्का और दो, पाकिस्तान तोड दो', 'नेहरू सरकार नष्ट करो', ''नथुराम गोडसे की जय' अशा विविध घोषणांनी सारे वातावरण दुमदुमून गेले.

संपूर्ण वंदे मातरम् गीतगायनानंतर संस्कृतातून एक मानपत्र वीर सावरकरांना अर्पण करण्यात आले. तसेच राजस्थान प्रांतिक हिंदुसभेच्या वतीनेही हिंदीमध्ये अभिनंदनपत्र वीर सावरकरांना देण्यात आले. त्यात वीर सावरकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास अवघ्या मोजक्या शब्दांत ग्रंथित केला असून, गांधीवधाच्या खटल्यात त्यांना सरकारने निष्कारण गोवले याविषयी सरकारचा तीव्र निषेध व्यक्त करून ते निष्कलंकपणे त्यातून बाहेर आले याविषयी संतोष व्यक्त करण्यात आला. अभिनंदनपत्र काव्यमय असून 'अभिनंदन कर रहा है वीर प्रतापका राजस्थान' अशा शब्दांनी अभिनंदनपत्राचा शेवट साधलेला आहे.